
सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३०८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १३ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - ५ रु. ❑ पृष्ठ -६



## संपादकीय ......

# शहाणपण आले, पण घडी चुकली

*शिवाजी पार्कवर रविवारी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संयुक्त प्रचारसभेत उद्धव ठाकरे म्हणाले, भावकी एक झाली की गावकी एक होते. उद्धव ठाकरे यांच्या या विधानाला फार मोठा अर्थ आहे, पण हा अर्थ समजायला त्यांना २० वर्षे लागली हे एक मोठे आश्चर्य आहे. हाच भावकी एक ठेवण्याचा विचार त्यांना जर २० वर्षांपूर्वी सूचला असता तर राज ठाकरे शिवसेनेतून बाहेर पडून त्या पक्षात उभी फूट पडली नसती. लहानपणापासून एकत्र असलेला त्यांचा चुलत भाऊ त्यांचा विरोधक झाला नसता. मनसे नावाचा शिवसेनेची ताकद कमी करणारा पक्ष निर्माण झाला नसता. इतकेच काय उद्धव आणि राज ठाकरे एकत्र असते तर एकनाथ शिंदे यांच्या बंडाला प्रोत्साहन देऊन शिवसेना फोडून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वारसदारांकडून शिवसेना पक्ष आणि चिन्ह हिरावून घेण्याची हिंमत भाजपने केली नसती.*

*शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यानंतर राज ठाकरे अशीच शिवसैनिकांची भावना होती, पण प्रत्यक्ष निर्णय वेगळाच झाला. राज ठाकरे यांना बाजूला करून ती जागा उद्धव ठाकरे यांना देण्यात आली. आपल्याला डावलले जात आहे, आपल्याला बाळासाहेबांपासून दूर ठेवण्यात येत आहे. त्यामुळे शिवसेनेत आपली घुसमट होत आहे, असे सांगून राज ठाकरे बाहेर पडले. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी निवडणुकीसाठी युती केली आहे. या युतीचे भवितव्य काय असेल ते दोन्ही ठाकरे बंधूंनीच ठरवायचे आहे. उद्धव ठाकरे सांगत आहेत की, आम्ही एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो आहोत, पण प्रश्न असा पडतो की, मग राज ठाकरे दूर का गेले? त्यामुळे पुढील काळात राज ठाकरे दूर जाणार नाहीत, असे वातावरण उद्धव ठाकरे यांना निर्माण करावे लागेल.*

*राज ठाकरे यांच्या भाषणातून कोट्या आणि कोपरखळ्या यांची बरसात होत असते, त्यामुळे समोरून हशा आणि टाळ्यांचा प्रतिसाद मिळत असतो. पण रविवारी राज ठाकरे यांनी जे भाषण केले आणि व्हिडिओच्या माध्यमातून जे काही उजेडात आणले, त्यामुळे फक्त महाराष्ट्रच नव्हे तर देशभरातील लोक अवाक झाले. राज यांनी याअगोदरही मोदी सरकारविरोधात व्हिडिओ लावले होते, पण मोदींच्या पंतप्रधानपदाच्या कालावधीत अदानींच्या उद्योगांचा जो देशभर साम्राज्यविस्तार झाला आहे, तो पाहिल्यावर मोदींना धक्का देण्यात राज ठाकरे यशस्वी झाले आहेत, असे म्हणायला हरकत नाही.*

*एकाच उद्योजकाचे किती लाड करायचे हे यावरून दिसून येते. म्हणजे देशातील इतर उद्योजकांवर किती अन्याय झाला असेल हेदेखील लक्षात येऊ शकेल. राज ठाकरे यांचे भाषण ऐकताना समोर बसलेले लोक स्तब्ध झाले होते. यावरून त्यांच्या भाषणातून त्यांनी मराठी माणसाच्या मनाला कसा हात घातला हे लक्षात येऊ शकेल. राज ठाकरे यांनी मराठी अस्मिता जागवल्यानंतर उद्धव ठाकरे यांचे भाषण झाले. उद्धव ठाकरे यांनीही महत्त्वाचे मुद्दे मांडले, पण राज यांच्या भाषणाने जे काही वातावरण निर्माण केले, त्यानंतर खरे तर दुसर्या भाषणाची गरज नव्हती. इतके राज यांनी समोर बसलेल्या आणि इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांवर त्यांचे भाषण ऐकणार्यांना झपाटून टाकले होते. राज यांचीही ताकद उद्धव ठाकरे यांनी यापुढे लक्षात घ्यायला हवी.*

*उद्धव आणि राज ठाकरे हे आज आम्ही मराठी माणसांसाठी, मुंबईसाठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र आलो आहोत, असे म्हणत असले तरी ती दोघांचीही गरज आहे. कारण उद्धव यांच्याकडे आता मूळ पक्ष आणि चिन्ह राहिले नाही. राज यांच्या सभांना प्रचंड गर्दी जमते, पण निवडणुकीत उमेदवारांचे डिपॉझिट जप्त होते. त्यामुळे अवहेलना सहन करावी लागते. पण हे दोन्ही भाऊ जर सुरुवातीपासून एकत्र राहिले असते तर अशी परिस्थिती आली नसती. मुंबईतून मराठी माणसांची संख्या दिवसागणिक कमी होत आहे. तो उपनगरे आणि त्याही पलीकडे फेकला जात आहे. मुंबईत आता ६०-७० मजल्यांचे टॉवर्स उभे राहत आहेत.*

*पूर्वी जशी दक्षिण मुंबई ही श्रीमंतांची म्हणून ओळखली जात होती, तशी आता चर्चगेट ते विरार आणि सीएसएमटी ते ठाणे इथपर्यंतचा भाग श्रीमंतांची मुंबई म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. त्यातून मराठी माणूस बाहेर फेकला जात आहे. जशी दक्षिण मुंबई धनिक उद्योगपतींची आहे, तिथे सामान्य मराठी माणूस घर विकत घेण्याचे स्वप्नही पाहू शकत नाही, इतका तिथल्या जागांचा भाव जास्त आहे. हीच अवस्था मुंबईच्या उर्वरित भागाची होत आहे. बहुतांश मराठी लोक हे नोकरी करणारे आहेत, त्यामुळे अमराठी लोकांच्या व्यावसायिक स्पर्धेत ते मागे पडतात. त्यात पुन्हा मराठी माणूस हा सभा संमेलनांना मोठ्या संख्येने जमत असला तरी व्यापार उदिमात तो एकमेकांना सहाय्य करताना दिसत नाही. त्यामुळे गुजराती, मारवाडी लोक जसे व्यापार उदिमात एकमेकांना समाजाचा पाठिंबा देतात आणि आपल्या समाज बांधवांचा धंदा बुडू देत नाहीत, तसे मराठी लोकांच्या बाबतीत होताना दिसत नाही.*

*राज ठाकरे यांनी आपल्या भाषणातून मराठी अस्मिता जागवून वास्तवाची जाणीव करून दिली. मराठी माणसांची पुढची लढाई फार अवघड आहे. कारण मुंबईत जशा गगनचुंबी इमारती वाढत जाणार आहेत, त्याचसोबत इथले जीवनमान अधिक महाग बनत जात आहे, त्यात टिकून राहण्यासाठी मराठी माणसाला भक्कम राजकीय पाठिंब्याची गरज लागणार आहे. त्यासाठी ठाकरे बंधूंना मराठी माणसाचे नेतृत्व करावे लागेल. कारण भाजप असो किंवा काँग्रेस असो, त्यांच्या पक्षांचे राज्यातील नेते हे केंद्रातील नेत्यांच्या आदेशाचे गुलाम असतात. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात तेच दिसून आले. त्यामुळे मुंबईतील मराठी माणसाचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी भूमिपुत्रांचे हित जपणार्या नेत्यांनी आपसातील मतभेद गाडून पाय रोवून उभे राहावे लागेल.*

# नयन हत्या प्रकरणातील दोन्ही मारेकरी काटोल येथून जेरबंद




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती** गांधी आश्रम येथील नयन नरेंद्र वायधणे हत्या प्रकरणात खोलापुरीगेट पोलिसांनी पसार दोन मारेकऱ्यांना काटोल येथून अटक केली. दिपक ईश्वर तायडे (वय ४२) आणि सागर ईश्वर तायडे (वय ३५ दोन्ही रा. गांधी आश्रम) अशी त्यांची नावे आहेत. या प्रकरणात आधीच तीन महिलांना अटक करण्यात आली होती. आता आरोपींची संख्या पाच झालेली आहे.दिपक तायडे यांच्या कुटूंबातील एका अल्पवयीन मुलीसोबत नयन वायधणेची ओळख होती. ते दोघे नेहमी एका दुसऱ्यासोबत बोलत होते. परंतु मुलीच्या कुटुंबीयांना ते मान्य नव्हते. नयन व त्याचा मित्र एका प्रचार रॅलीत दुचाकीवरून गांधी आश्रम येथून रविवारी जात असतांना मुलीच्या नातेवाईकांनी त्याच्यावर प्राणघातक हल्ला चढवून त्याची हत्या केली होती. खोलापुरीगेट पोलिस पुढील तपास करीत आहेत

## राजस्थानमधील खुनाचा फरार आरोपी मोर्शीत पकडला



**विदर्भ प्रजासत्ताक, दि.१३ अमरावती-** मोर्शी येथे राजस्थानमधील खुनाच्या गुन्ह्यातील एका फरार आरोपीला अटक करण्यात आली आहे. मोहम्मद इसहाक मोहम्मद शफी लोहार (वय ३८) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. राजस्थानच्या श्रीनाथजी मंदिर, नागद्वारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तो फरार झाला होता.आरोपी मोहम्मद इसहाक याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) अन्वये राजस्थानमध्ये गुन्हा दाखल आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो फरार झाला होता आणि राजस्थान पोलीस त्याचा शोध घेत होते.दरम्यान, हा आरोपी मोर्शी येथे लपून बसल्याची माहिती राजस्थान पोलिसांना मिळाली. त्यांनी तात्काळ मोर्शी पोलिसांशी संपर्क साधला.

# संक्रातीला पोटभर तिळगुळ खा आणि आरोग्य सुदृढ ठेवा




**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक** इंग्रजी नववर्षाचा पहिला सण मकर संक्रात असतो. हा सण सूर्य जेव्हा मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा साजरा केला जातो. या दिवशी दानधर्म, स्नान आणि पूजा करणे याला विशेष महत्त्व आहे. यंदा १४ जानेवारी रोजी मकरसंक्रातीचा सण




साजरा होणार आहे. संक्रातीला आकाशात पंतगबाजी करण्यात येते, तिळगुळाचे लाडू देत एकमेकांना शुभेच्छा देण्यात येतात. त्यामुळे घराघरात तिळगुळाचे लाडू बनवण्याची तयारी सुरु झाली आहे. संक्रातीला तिळगुळ देण्याची प्रथा असली तरी ती आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. तिळातील विविध गुणधर्म शरीराला फायदेशीर आहे. जाणून घेऊयात तिळगुळ खाल्ल्याने शरीराला काय फायदे होतात.

**शरीर उबदार राहण्यासाठी –**

संक्रातीच सण हिवाळ्यात असतो. या दिवसात शरीराला उष्णतेची गरज असते. तिळामध्ये निसर्गत: उष्ण गुणधर्म असतात. त्यामुळे या दिवसात तिळाचे सेवन करणे फायद्याचे ठरते.

**त्वचेसाठी उपयुक्त –**

तिळामध्ये शरीरासोबत सौंदर्य अबाधित ठेवणारे गुणधर्म असतात. हिवाळ्यात कोरड्या हवामानामुळे त्वचा रुक्ष होते. अशावेळी तुम्ही तिळाचे सेवन केलेत तर त्वचेला मऊ, मुलायम ठेवण्यासाठी उपयुक्त असतात.

**निरोगी हृदयासाठी –** तिळामध्ये कॅल्शियम, आयर्न, मॅग्नेशियम, झिंक आणि सेलेनियम गुण असतात. हे गुणधर्म हृदय निरोगी ठेवण्यासाठी उपयुक्त असतात. जेवणात तिळाच्या तेलाचा वापर केल्यास हृदय निरोगी राहते.

**व्हिटॅमिन D –**

थंडीमध्ये व्यायाम किंवा मॉर्निंग वॉक करायला कंटाळा येतो. मात्र, मकरसंक्रातीच्या निमित्ताने अनेकजण संक्रातीनिमित्त पतंग उडवण्यासाठी घराबाहेर पडतात. त्यामुळे शरीराला आवश्यक असणारे डी – जीवनसत्त्व सहजरित्या सूर्याच्या किरणापासून मिळते.

# सेंद्रिय भाजीचे अनेक फायदे, खरा सेंद्रिय भाजीपाला ओळखायचा कसा

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक** आरोग्याबाबतची जागरूकता वाढत असल्याने सेंद्रिय शेतमालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, या शेतमालाची मागणी वाढत आहे. यातून बाजारात सेंद्रिय, नैसर्गिक, रसायनमुक्त असे शब्दप्रयोग असलेले फलक व लेबल बघायला मिळतात. मात्र, या शब्दांआड लपलेले सत्य सामान्य ग्राहकाला सहज कळत नाही.

भाजीपाला अथवा धान्य दिसायला ताजे, टवटवीत, हिरवेगार वाटत असले तरी हा शेतमाल सेंद्रिय असतोच, असे नाही. प्रत्यक्षात सेंद्रिय व रासायनिक शेतमालामधील फरक ओळखणे ग्राहकांसमोर मोठे आव्हान बनले आहे. केवळ नावावर किंवा विक्रेत्यांवर विश्वास न ठेवता वैज्ञानिक दृष्टिकोनातून चौकसपणे तपासणी करणे गरजेचे आहे. मग खरा सेंद्रिय शेतमाल ओळखायचा कसा?

**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

**सेंद्रिय शेती म्हणजे काय ?–** सेंद्रिय शेतमालाच्या उत्पादनासाठी कुठल्याही प्रकारच्या रासायनिक घटकांचा वापर केला जात नाही. या पिकांची वाढ व उत्पादन हे मातीचे आरोग्य व हवामानाची अनुकूलता यावर अवलंबून असते.

या पिकांतील तण तसेच त्यावरील रोग व किडींच्या व्यवस्थापनासाठी रासायनिक खते, तणनाशके, कीटकनाशके, बुरशीनाशकांचा वापर केला जात नाही. या पिकांच्या उत्पादनासाठी शेणखत, कंपोस्ट खत, गांडूळ खत, हिरवळीची खते व इतर सेंद्रिय पदार्थांचा वापर केला जातो.

**या बाबी तपासून घ्या**

सेंद्रिय शेतमाल खरेदी करण्यापूर्वी त्याला नॅशनल प्रोग्राम फॉर ऑरगॅनिक प्रॉडक्शन (एनपीओपी) किंवा पार्टीसिपटोरी गॅरंटी सिस्टिम




(पीजीएस) चे प्रमाणपत्र आहे का? त्यावर या दोन्हीपैकी एका संस्थेचा लोगो, क्रमांक आहे का ते तपासून बघा. त्या शेतमालावर उत्पादकाचे नाव, पत्ता, त्याला सेंद्रियतेचे प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थेचे नाव व पत्ता तपासून बघा.

**सेंद्रिय शेतमाल ओळखायचा कसा?**

सेंद्रिय भाजीपाला व फळांचा आकार एकसारखा नसतो, तो लहान-मोठा असतो. रंग नैसर्गिक असतो व चमकदार नसतो. या शेतमालाचा गंध नैसर्गिक व थोडा जास्त तीव्र असतो. चव अधिक चविष्ट व नैसर्गिक असते. या शेतमालावर मातीचे अवशेष असू शकतात. तुलनेत रासायनिक घटकांचा वापर केलेल्या शेतमालाचा आकार व रंग एकसारखा, चमकदार व देखणा असतो.सेंद्रिय भाजीपाला व फळे जास्त वेळ ताजी राहतात, पण पाण्यात जास्त वेळ विरघळत नाहीत. या पिकांवर कीटकनाशकांची फवारणी केली जात नसल्याने हा शेतमाल कीड लागला किंवा त्यावर डाग असलेला दिसू शकतो. विक्रेत्याला तो ज्या शेतकऱ्याकडून सेंद्रिय शेतमाल खरेदी करतो, तो शेतकरी पिकांच्या उत्पादनासाठी कोणत्या कृषी निविष्ठांचा वापर करतो, याची व त्याच्या शेती करण्याच्या पद्धतीची विचारणा करा.

# श्री गजानन महाराजांचा जयघोष पालखी सोहळा शेगावी मार्गस्थ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३बोरगाव मंजू–** बोरगाव मंजू येथील लक्ष्मीनगरातील संत गजानन महाराज मंदिरातून पालखी सोहळा रविवारी शेगावकडे मार्गस्थ झाला. टाळ मृदंगाच्या गजरात श्री गजानन महाराजांचा जयघोष करत वारकरी हरिनामात दंग झाले. पाच दिवस चालणाऱ्या सोहळ्यात विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन होणार आहे. असा राहणार प्रवास पालखी सोहळ्याला रविवारी बोरगाव मंजू येथून प्रारंभ. अकोला येथे मुक्काम करून सकाळी निघून रात्री गायगाव येथे पालखी सोहळा मुक्कामी असेल. सकाळी गायगाव नागझरीकडे वारकरी मार्गस्थ होतील. रात्री श्री क्षेत्रे रात्री गोमाजी महाराज, नागझरी येथे मुक्काम राहणार आहे. मंगळवारी सकाळी संतनगरी शेगावकडे पालखी सोहळा निघणार आहे.

**असा झाला प्रारंभ**

सोहळ्यात ५०० भाविक सहभागी झाले आहेत. रविवारी सकाळी श्रींच्या चरणी महापूजेसह जलाभिषेक करून पालखी सोहळ्याचा श्रीगणेशा झाला. पालखी मार्गावर भाविकांनी स्वच्छतेसह रांगोळी काढून श्रींच्या चरणी मनोभावे सेवा अर्पण केली. या पालखी



सोहळ्यात पांढरा शुभ्र वस्त्र व डोक्यावर टोपी, महिला सेवाधारी हातात टाळ मृदंगाच्या गजरात जयघोष करत मार्गस्थ झाले.

# बडनेरा रेल्वेस्थानक परिसरातून २१ किलो गांजा जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती–** अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या कर्मचाऱ्यांनी सोमवारी सकाळी बडनेरा रेल्वे स्थानक परिसरात तीन युवकांना अटक करून त्यांच्या ताब्यातून २१.६४० किलो गांजा व अन्य साहित्य असा एकूण ४ लाख ३६ हजार २१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. कैलास श्यामराव शिंदे (वय १९), नयन सुनिल आमले (वय २१ दोन्ही रा. नांदगावपेठ) आणि सुरज उर्फ मोंटू गणेशराव तानोडे (वय २८ रा. नवसारी) अशी

**अटकेतील युवकांची नावे आहेत.**

अंमली पदार्थ विरोधी पथकाने ही कारवाई केली. चार युवक गाँजा घेऊन अमरावतीला रेल्वेने येत आहे. या माहितीच्या आधारावर पथकातील कर्मचाऱ्यांनी बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचला. सोमवारी सकाळी चार युवक रेल्वे स्टेशनमधून बाहेर येतांना दिसताच पोलिसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु एक युवक पसार झाला मात्र तिघांना पोलिसांनी पकडून त्यांच्या ताब्यातून २१.६४० किलो गांजा जप्त व त्यांना अटक केली.

# शकुंतला रेल्वे स्टेशनवर पत्रकार दिनानिमित्त ५२ पत्रकार व नगराध्यक्षांचा भावपूर्ण सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अचलपूर–** आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिनाचे औचित्य साधत तसेच शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीच्या ३८ व्या प्रतीकात्मक जनआंदोलनाच्या निमित्ताने अचलपूर रेल्वे स्टेशन परिसरात भव्य पत्रकार व नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जुळवा नगरीतील आजी-माजी एकूण ५२ पत्रकार मित्रांचा तसेच अचलपूर नगरपालिकेच्या नवनियुक्त नगराध्यक्षा सौ. रुपाली अभय माथने यांचा भावपूर्ण नागरी सत्कार करण्यात आला.समाजासाठी निर्भय, नि:पक्ष व निर्भीड लेखनातून जनतेचा आवाज बुलंद करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान हा कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. यावेळी मूर्ती तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार डॉ. अनंत भारतीय, गजानन देशमुख व प्रमोद नईकेले यांचा विशेष सन्मान शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला.कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. रुपाली माथने, संपादक सुधीर गणवीर, पवन श्रीवास्तव, नंदेश अंबाडकर, संतोष नरेडी, प्रभाकर वानखडे, राजा धर्माधिकारी, योगेश खानझोडे, दिपा तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या भाषणात पत्रकारांनी शकुंतला रेल्वे प्रकल्पाच्या प्रश्नाकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली.या कार्यक्रमाचे आयोजन शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीसह एकूण नऊ सामाजिक संघटनांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी पत्रकार भवनाची मागणीही ठळकपणे मांडण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध सामाजिक कार्यकर्ते, सत्याग्रही व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. ३८ जनआंदोलनाच्या आठव्या वर्षात प्रवेश करताना केंद्रिय रेल्वे मंत्र्यांचे लक्ष या आंदोलनाकडे वेधले जाईल का, असा सवाल उपस्थित करण्यात आला.

दैनिक विदर्भ प्रजासत्ताक

यह समाचार पत्र मालक शुभांगी अरुण जोशी, प्रकाशक अरुण जोशी इन्होने मुद्रक हेमंत रामकिशोर जैस्वाल इनके मुद्रणालय श्रद्धा प्रिंटर्स, लक्ष्मी नगर अमरावती, जिल्हा अमरावती महाराष्ट्र यहां छपवाकर कार्यालय श्याम नगर, काँग्रेस नगर अमरावती - ४४४६०४ जि. अमरावती महाराष्ट्र से प्रकाशित किया - संपादक शुभांगी अरुण जोशी

Dainik Vidarbha Prajasattk evening news paper owned by Shubhangi Arun Joshi and published by Arun Joshi and printed by Hemant Ramkishor Jaiswal , Shraddha Printers, Lakshmi Nagar , Amravati , district Amravati and published at Shyam Nagar office , Congress Nagar Road Amravati-444606 . Editor : Shubhangi Arun Joshi . Contact : 9607673850 , E-mail : prajasattaknews24@gmail.com

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३०८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १३ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राज्यातील १२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीची घोषणा, ५ फेब्रुवारीला मतदान

### ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी; १६ ते २१ जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मुंबई**




राज्य निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेला सुरुवात झाली आहे. त्यात आयोगाने राज्यातील प्रलंबित असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांची घोषणा केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी राज्य निवडणूक आयोगाला या निवडणुका १५ फेब्रुवारीपर्यंत घेण्याचे आदेश दिले होते.

दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समितीसाठी राज्यात निवडणूक होईल. यात कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव व लातूर या १२ जिल्हा परिषदांचा समावेश आहे.

सोलापूर जिल्ह्यातील कुर्दुवाडी येथील जिल्हा परिषद, पंचायत समिती मेंबर्स असोसिएशनचे पदाधिकारी कैलास गोरे यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. नगरपालिका, महापालिकांप्रमाणेच ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्याही निवडणुका न्यायालयीन निर्णयास अधीन राहून घ्याव्यात, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती.

**असा असेल निवडणुकीचा कार्यक्रम**

१६ जानेवारी ते २१ जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज भरता येणार

२२ जानेवारी रोजी अर्जाची छाननी होणार

२७ जानेवारी रोजी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख

२७ जानेवारी चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी - दुपारी ३.३० वाजेनंतर

५ फेब्रुवारी रोजी १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक होणार (मतदानाची वेळ - ७.३० - ५.३० वाजेपर्यंत)

७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजेपासून मतमोजणीला होणार सुरुवात

## प्रचार कालावधी संपल्यानंतरही उमेदवाराला घरोघर प्रचार करण्याची मुभा;निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**




राज्यात २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. महापालिकांच्या निवडणुकीच्या मतदासाठी काही तास शिल्लक असताना मुंबईतील निवडणूक विभागाने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. निवडणुकीच्या प्रचाराचा कालावधी संपल्यानंतरही मुंबईतील उमेदवाराला घरोघर प्रचार करण्याची मुभा दिली आहे. या अजब निर्णयाबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केल्याप्रमाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचाराचा कालावधी १३ जानेवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत आहे. मात्र याचदरम्यान निवडणूक आयोगाने एक मोठा निर्णय घेतला आहे. प्रचार कालावधी संपल्यानंतरही मुंबई महानगरपालिकेतील उमेदवाराला घरोघर प्रचार करण्यास निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे. त्यामुळे प्रचाराची मुदत संपल्यानंतरही उमेदवारांना घरोघर जाऊन प्रचार करता येणार आहे.

निवडणूक आयोगाच्या या निर्णयाने नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.निवडणूक निर्णय अधिकारी कृष्णा जाधव यांनी महानगरपालिकेच्या ए, बी आणि ई विभागातील सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांची नुकतीच एक बैठक घेतली होती. त्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये हा अजब निर्णय नमूद आहे. राजकीय पक्ष आणि उमेदवारांना १३ जानेवारीला सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत प्रचार करता येणार आहे. परंतु त्यानंतरही १५ जानेवारीपर्यंत ते घरोघरी जाऊन प्रचार करू शकतील, मात्र त्यांना कोणत्याही प्रकारची पत्रके वाटता येणार नाहीत, असे इतिवृत्तामध्ये नमूद आहे. याशिवाय बैठकीत घेतलेल्या इतर निर्णयांचाही त्यात समावेश आहे.

**राज्यात पहिल्यांदाच घडणार**

निवडणूक आयोगाची महापालिका निवडणूक प्रचाराची वेळ १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आहे. परंतु राज्य निवडणूक आयोगाने १३ ते १५ जानेवारी दरम्यान पत्रके न वाटता घरोघरी जाऊन प्रचाराला परवानगी दिली आहे. राज्यभरत हे प्रथमच घडत आहे. कोणत्याही निवडणुकीचा प्रचार ४८ तास आगोदर संपतो. त्यामुळे निवडणूक आयोगाने घेतलेलाहा निर्णय वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे.

## भाजपसोबत गठबंधन केल्याने वरूड नगरपरिषदेत काँग्रेसच्या दोन नगरसेवकांवर निलंबनाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

वरूड नगरपरिषदेतील काँग्रेस पक्षाच्या अधिकृत चिन्हावर निवडून आलेल्या दोन नगरसेवकांनी पक्षशिस्तीचा भंग केल्याप्रकरणी काँग्रेस पक्षाने कठोर कारवाई केली आहे. भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांसोबत गटबंधन केल्याचा ठपका ठेवत काँग्रेसने मो. निसार मो. शौकत (गटनेता) आणि सौ. भाग्यश्री निलेश अधव (नगरसेविका) यांना सहा (६) वर्षांसाठी पक्षातून निलंबित केले आहे.अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण) चे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध उर्फ बबलु देशमुख यांनी याबाबत अधिकृत निलंबन आदेश जारी केला आहे. जिल्हा काँग्रेस कार्यालयास कोणतीही पूर्वकल्पना अथवा अधिकृत माहिती न देता भाजपच्या सदस्यांसोबत गठबंधन करण्यात आल्याचे वृत्त प्रसारमाध्यमांतून समोर आले. ही बाब काँग्रेस पक्षाच्या धोरणांशी विसंगत असून पक्षशिस्तीचा गंभीर भंग असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.या कृत्यामुळे काँग्रेस पक्षाची प्रतिमा मलिन झाल्याचे सांगत, संबंधित दोन्ही नगरसेवकांना सहा वर्षांच्या कालावधीसाठी पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. निलंबनाच्या कालावधीत ते पक्षाच्या कोणत्याही पदावर राहू शकणार नाहीत तसेच पक्षाच्या बैठका, कार्यक्रम किंवा उपक्रमांमध्ये सहभागी होता येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.हा निलंबन आदेश तात्काळ लागू करण्यात आला असून, या कारवाईमुळे वरूड नगरपरिषद व राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

## अयोध्येच्या धर्तीवर नाशिक मध्ये होणार श्रीराम मंदिर

### गिरीश महाजनांची घोषणा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नाशिक**

महापालिका निवडणुकीदरम्यान, राज्यातील वातावरण चांगलंच तापलेलं असतानाच आता राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी मोठी घोषणा केलीयं. अयोध्येतील मंदिराच्या धर्तीवर नाशिकच्या तपोवनात श्रीराम मंदिर बांधण्याची घोषणा महाजन यांनी केलीयं. नाशिकमध्ये आयोजित सभेत ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, मुंबई आणि पुण्यानंतर नाशिक हे शहर चर्चेत आहे. नाशिकला सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. या शहराला सामाजिक सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा आहे. त्या दृष्टीने या शहराच्या विकासावर आमचे खास लक्ष असणार आहे. नाशिकला तपोवनात अयोध्येतील मंदिराच्या धर्तीवर श्री राम मंदिर बांधणार असल्याचं महाजन म्हणाले आहेत.

सिडको येथील भाजपच्या उमेदवारांसाठी गिरीश महाजन यांनी सोमवारी सभा घेतली. या सभेमध्ये त्यांनी राम मंदिराबाबत घोषणा केल्याने ही सभा मतदारांमध्ये चांगलीच चर्चेचा विषय ठरली आहे.

## डगेवारांना कारावास झाला होता, पण.., भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आरएसएसच्या भूमिकेवर ओवेसींनी उपस्थित केला सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती**



राज्यात महापालिका निवडणुकेचे वातावरण जबरदस्त तापले आहे. सर्वच पक्ष एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसत आहेत. यातच आता, एआयएमआयएम प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील आरएसएसच्या भूमिकेसंदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. संघाचे संस्थापक के. बी. हेडगेवार यांना, ब्रिटिश राजवटीला विरोध केला म्हणून नव्हे, तर खिलाफत चळवळीला पाठिंबा दिला, म्हणून कारावास झाला होता, असे ओवेसी यांनी म्हटले आहे. ते छत्रपती संभाजीनगर येथे १५ जानेवारीला होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित प्रचारसभेत बोलत होते. दरम्यान त्यांनी प्रदेशात बांगलादेशी नागरिक असल्याचे दावे फेटाळून लावत, जर असे कोणी आढळल्यास ते केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या अपयशाचे द्योतक असल्याचेही ते म्हणाले.

भाजपवर टीका करता ओवैसी म्हणाले, अशा प्रकारचे मुद्दे उपस्थित करत भाजप हिंदुत्वाचा अजेंडा राबवत आहे आणि प्रशासनातील अपयशावरून लक्ष विचलित करत आहे. एवढेच नाही तर, 'इंग्रजांविरुद्ध लढताना संघाचा कुण्या नेत्याला तुरुंगवास झाला?' असा सवालही त्यांनी उपस्थित केला. तसेच, ते म्हणतात,हेडगेवार यांना कारावास झाला होता. मात्र त्यांना खिलाफत आंदोलनाला पाठिंबा दिल्याबद्दल कारावास झाला होता. आणि आज ते मुस्लिमांप्रति द्वेष पसरवत आहेत, असा दावाही त्यांनी केला.

## मतांचे वाण लुटण्यासाठी मतदारांना भेटवस्तू दिल्यास उमेदवारी गोत्यात येणार

### आमिष दाखवणे पडणार महागात : वाढणार अडचणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

महापालिका निवडणुकीच्या मतदानाच्या अगदी एक दिवस आधी मकर संक्रांत आहे. उमेदवारांसाठी ही संधी आणि धोका दोन्ही ठरत आहे. महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी शहरभर हळदी - कुंकू कार्यक्रम आयोजित करून मतांचे वाण लुटण्यासाठी भेटवस्तू देण्याचा उमेदवारांनी प्रकार केल्यास उमेदवारी गोत्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उमेदवारांनी मतांचे वाण लुटण्यासाठी मतदारांना आमिष दाखवू नये किंवा कोणत्याही भेटवस्तू देऊ नयेत, अन्यथा आचारसंहिता भंगचा गुन्हा दाखल होऊ शकतो.

**आचारसंहिता उल्लंघनाच्या महापालिकेत तक्रारी**

महापालिका निवडणूक काळात आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या काही तक्रारी दाखल झाल्या आहेत. यामध्ये परवानगीशिवाय कार्यक्रम, बॅनर लावणे, मतदारांना आमिष दाखवणे आदींचा समावेश आहे.



**मतदानाआधी मकर संक्रांतीचा सण**

यंदा महापालिका निवडणुकीचे मतदान १५ जानेवारीला होत असून, त्याच्या एक दिवस आधी १४ जानेवारीला मकर संक्रांत आहे. सणाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यक्रमांचे प्रमाण वाढते. याच संधीचा गैरवापर करून प्रचार करण्याचे प्रकार समोर येऊ शकतात.

**वाणासोबत प्रचार साहित्याचेही पॅकिंग**

काही उमेदवारांकडून वाणाच्या पिशव्यांमध्ये थेट प्रचार साहित्य ठेवले जाऊ शकते. उमेदवाराचे नाव, चिन्ह, फोटो दिले जात जाऊ शकतात.

**...असे करणे म्हणजे आचारसंहितेचे उल्लंघन**

निवडणूक आचारसंहितेनुसार कोणत्याही स्वरुपात भेटवस्तू देणे अथवा आमिष दाखवणे प्रतिबंधित आहे. सणाच्या नावाखाली दिलेले वाणसुद्धा मतदारांना प्रभावित करत असल्यास ते उल्लंघन ठरते.

**आरोप सिद्ध झाल्यास उमेदवारी रद्द, कैद**

एखाद्या उमेदवाराविरोधात भेटवस्तू वाटपाचा आरोप सिद्ध झाला, तर त्याची उमेदवारी रद्द होऊ शकते. यासोबतच दंड किंवा कारावासाचीही तरतूद कायद्यात आहे.

## प्रचाराच्या शेवटच्या दिवशी मुख्यमंत्री झाले दुचाकीस्वार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**





प्रचाराच्या शेवटच्या दिवशी नागपुरात रॅली, रोड शोची स्पर्धा लागली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दुचाकीवर स्वार होऊन नागपूरकरांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी खूप दिवसांनी दुचाकी चालवत असल्याने असहज वाटत असल्याचे सांगितले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही मुख्यमंत्र्यांना साथ दिली. आजपर्यंत नागपुरात केवळ भाजपने विकास केला असून नागपूरकर यावेळी भरघोस मतदान करून सदस्यांचा मागील विक्रम मोडित काढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विरोधकांनी कधीही विकास केला नसून ती जबाबदारी आमच्यावर सोपवा, असे आवाहन त्यांनी नागपूरकरांना केले.

प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या गृहनगरातून दिवसाच्या प्रचाराला सुरुवात केली. सकाळी साडेअकराच्या सुमारास भारत माता चौकातून कार्यकर्त्यांसोबत ते दुचाकीने निघाले. त्यांच्यासमवेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार प्रवीण दटके, आमदार आशिष देशमुख, आमदार कृपाल तुमाने यांच्यासह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते होते. प्रत्येक चौकांत प्रवेशद्वार अन त्यांच्यावर पुष्पवृष्टीने वर्षाव करीत कार्यकर्ते भाजपच्या विजयाचा जयघोष करीत होते. शहीद चौक, बडकस चौक मार्गे बाईक रॅली महाल येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ आली. येथे बाईक रॅलीचा समारोप झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला माल्यार्पण केले.

कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयघोष केला. मुख्यमंत्र्यांनी यावेळी नागपूकरांना भाजपला मतदान करण्याचे आवाहन केले. दरम्यान प्रचाराच्या शेवटच्या दिवशी सकाळपासून उमेदवारांची धावपळ सुरु झाली आहे. राजकीय पक्ष व उमेदवारांनी सायंकाळनंतर छुप्या बैठकांच्या अजेंड्यावर काम करण्यासाठी कंबर कसली आहे.

महापालिकेच्या ३८ प्रभागातील १५१ नगरसेवकपदासाठी ९९३ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणुकीसाठी ३ जानेवारीपासून प्रचाराला सुरुवात झाल्यानंतर गेल्या अकरा दिवसांपासून भाजप, काँग्रेस, बसप, शिवसेना उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस, आप, मनसेसह अपक्ष उमेदवारांकडून मते मागण्यासाठी सभा, रॅली, पदयात्रेवर भर देण्यात आला. आतापर्यंत सभांमध्ये भाजपने आघाडी घेतली. या काळात काँग्रेस नेते व भाजप नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडण्यात आल्याने निवडणुकीत रंगत आली. काँग्रेसपाठोपाठ रविवारी भाजपनेही आपला जाहीरनामा प्रकाशित केला. भाजपसाठी प्रथमच बंडखोर डोकेदुखी ठरत असल्याचे चित्र आहे. त्या तुलनेत काँग्रेसने बंडखोरांना शांत करीत दिलेल्या उमेदवारांच्या समर्थनात उभेही केले. बसपसाठी कुणी नेता सभेसाठी आला नसल्याने उमेदवारांना स्वत:च घाम गाळावा लागत आहे. गेल्या दहा दिवसांत सर्वच पक्षांकडून मोहल्ला सभाही घेण्यात आल्या असून भाजप, काँग्रेससह सर्वांनीच जिंकण्याचे दावे केले आहे.

## देवेंद्र फडणवीस स्वत:च्या हिंमतीवर झालेले मुख्यमंत्री नाहीत, त्यांना..; राज ठाकरेंची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १३ मुंबई**

महाराष्ट्रातील मुंबईसह २९ महापालिकांच्या निवडणुका १५ जानेवारीला होणार आहेत. १६ जानेवारीला निकाल लागणार आहे. या अनुषंगाने प्रचाराचा आजचा शेवटचा दिवस आहे. राज ठाकरेंनी न्यूज १८ मराठीला दिलेल्या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस हे बसवलेले मुख्यमंत्री आहेत अशी टीका केली आहे.

मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान हे स्वतःच्या हिंमतीवर मुख्यमंत्री झाले आहेत. पण देवेंद्र फडणवीस यांचं तसं नाही. साधी गोष्ट आहे. एक माणूस मुख्यमंत्री होता, मुख्यमंत्रिपदावरुन निवडणूक संपल्यानंतर वाद झाले. त्यानंतर शिवसेना फोडली, मग निवडणूक झाली संपली. मग एकनाथ शिंदेंना आधी मुख्यमंत्री केलं. यांना (फडणवीस) उपमुख्यमंत्री केलं गेलं. त्यांनी ते स्वीकारलं. जर एखादा बसलेला माणूस असता, ठाम असता तर त्याने नकार दिला असता. बसलेला आणि बसवलेला यात फरक असतो. भारतीय जनता पक्ष जो आम्ही पूर्वीपासून पाहात आलो तो भारतीय जनता पक्ष आज उरलेला नाही. हे भाजपातले लोकही मान्य करतात.

एक लक्षात घ्या मूळ देश असा नव्हताच. ज्यांना आज राज्यं म्हणतो ते वेगवेगळे देशच होते. १९४७ मध्ये झालेला हा देश आहे. प्रत्येक राज्याची एक भाषा आणि संस्कृती आहे, वेगळे सण आहेत. अहमदाबाद, गांधीनगर याची मुंबई करा ना. आम्हाला हेवाही वाटेल आणि आनंदही वाटेल. आमची शहरं का बळकावत आहात? असा सवाल राज ठाकरेंनी केला. खरी संपत्ती ही तुमची जमीन आहे. तुमची भाषा आणि जमीन गेली तर तुमचं अस्तित्व संपलं.

## २९ पैकी २८ महानगरपालिका महायुती जिंकणार', चंद्रकांत पाटील यांचा दावा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ पुणे**

नगर परिषद निवडणुकीत दणदणीत विजय मिळवल्यानंतर राज्यातील सत्ताधारी असलेल्या भाजपाने २९ महानगपालिकांच्या निवडणुकीत अधिकाधिक ठिकाणी विजय मिळवण्यासाठी जोर लावला आहे. काही ठिकाणी स्वबळावर तर काही ठिकाणी युतीच्या माध्यमातून भाजपा या निवडणुकीला सामोरा जात आहे. दरम्यान, राज्यात मतदान होत असलेल्या २९ पैकी २८ महानगरपालिकांमध्ये महायुतीचा महापौर बसेल, असा दावा भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि राज्य सरकारमधील मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केला आहे.

सांगली येथे प्रचारसभेला आले असताना चंद्रकांत म्हणाले की, राज्यात मतदान होत असलेल्या २९ महानगरपालिकांपैका २८ महानगरपालिकांमध्ये महायुतीचा विजय होईल. तिथे महायुतीचा महापौर बसेल. त्यात कुठे भाजपाचा महापौर असेल, कुठे शिंदेसेनेचा असेल, तर कुठे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचा असेल. अर्थातच त्यात भाजपाचे सर्वाधिक महापौर असतील. मी यातून एक महानगरपालिका वगळली आहे. ती महानगरपालिका म्हणजे मालेगाव, असेही चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, चंद्रकांत पाटील यांच्याकडे जबाबदारी असलेल्या सांगली महानगरपालिकेमध्येही भाजपाचा विजय होईल, असा विश्वास चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला. सांगलीकरांचा मूड हा प्रो बीजेपी आणि बीजेपीची सत्ता आणण्याचा आहे.

# शहरात गुरुवारी राहणार ३००० पोलिसांचा तगडा बंदोबस्त

## ९०० होमगार्ड आणि एक एसआरपीएफ कंपनी दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती**आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरात कडक सुरक्षा व्यवस्था लावण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि भयमुक्त पार पडावी यासाठी पोलिस प्रशासनाने व्यापकस्तरावर सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन केले आहे. निवडणूक ड्युटीसाठी ९२ एपीआय-पीएसआय, ३१ पोलिस निरीक्षक आणि १,८०० पुरुष आणि महिला पोलिस कर्मचारी निवडणूक कर्तव्यासाठी तैनात करण्यात आले आहेत. संवेदनशील भागांत करडी नजर ठेवण्यासाठी शहरात अतिरिक्त पोलिस दल देखील तैनात केले आहे. सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी, शहरात ९०० होमगार्ड, एक एसआरपीएफ कंपनी आणि दोन उपविभागीय



पोलिस अधिकारी (डीवायएसपी) तैनात करण्यात आले आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेचा संदेश देण्यासाठी विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत शक्तीप्रदर्शन केले जात आहे.

### दारू तस्करांसाठी मास्टर प्लॅन

मंगळवारी सायंकाळी ५.३० वाजता प्रचार पूर्णपणे थांबवण्यात येईल. शहरात ड्राय डे देखील लागू केला जाईल. मतमोजणी प्रक्रियेदरम्यान दारूतस्कर मोठ्याप्रमाणात सक्रिय राहतील असा अंदाज आहे. पोलिसांनी यासाठी आधीच एक मास्टर प्लॅन तयार केला आहे. गुन्हे शाखेसह हे पथक सर्वपोलिस ठाण्यांच्या डीबी पथकांसह विविध नियुक्त पथकांद्वारे दारू तस्करांना लक्ष्य करतील.

### सीपी राकेश ओला यांचे वैयक्तिक लक्ष



पोलीस आयुक्त राकेश ओला संपूर्ण निवडणूक व्यवस्थेवर वैयक्तिकरित्या लक्ष ठेवत असून मिनिट टू मिनिट अपडेट्सह परिस्थितीचा आढावा घेत आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे आणि कोणत्याही अफवा किवा आक्षेपार्ह कृतीची त्वरित तक्रार पोलिसांना करावी असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे. महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. १५ जानेवारी रोजी मतदान आणि १६ जानेवारी रोजी मतमोजणी होईल.

### पोलीस पूर्णपणे सतर्क

मंगळवारला सायंकाळपर्यंत राजकीय सभा, चौकात चौकात बैठका, रॅली आणि घरोघरी प्रचार मोठ्या प्रमाणात सुरू आहे. निवडणूक वातावरण बिघडवण्याचा कोणताही प्रयत्न हाणून पाडण्यासाठी पोलिसांनी आधीच कडक उपाययोजना केल्या आहेत. पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व १० पोलिस ठाण्यांच्या क्षेत्रात जास्तीत जास्त कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निवडणुका शांततेत आणि निष्पक्षपणे पार पडतील यासाठी पोलिस पूर्णपणे सतर्क आणि सज्ज आहेत.

# शहरात उमेदवारांच्या अनधिकृत फलकांचा सुळसुळाट

## प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती**अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुरू असलेला अकरा दिवसांचा प्रचार मंगळवारी सायंकाळी ठीक साडेपाच वाजता थांबणार आहे. गत अकरा दिवसांपासून शहरातील प्रत्येक प्रभागात उमेदवारांकडून जोरदार प्रचार, पदयात्रा, सभा, बैठका, रॅली आणि मेळाव्यांचा सपाटा सुरू होता. अखेरच्या दिवशी सर्वच पक्षांकडून शक्तीप्रदर्शनावर भर दिला जात आहे.

महापालिका क्षेत्रातील २२ प्रभागांमध्ये प्रचारासाठी तब्बल ७७६ वाहनांना परवानगी देण्यात आली होती. त्याचप्रमाणे ४२६ जणांना जाहिरात फलकांचे परवाने, तर ४३५ जणांना ध्वनीक्षेपक (लाऊडस्पीकर) परवाने मंजूर करण्यात आले.



### ४ हजारांहून अधिक अनधिकृत पोस्टर-बॅनर ?

या निवडणुकीतील सर्वात गंभीर बाब म्हणजे शहरभरात ४ हजारांहून अधिक अनधिकृत पोस्टर व बॅनर झळकत असल्याचे चित्र आहे. अधिकृत परवानगी मात्र केवळ ४२६ फलकांसाठीच देण्यात आली आहे. प्रत्यक्षात मात्र एका-एका प्रभागातच ४०० पेक्षा अधिकफलक लावण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसन येत आहे. मात्र याबाबत एकही तक्रार दाखल झालेली नाही. त्यामुळे सर्वच स्तरांवर तेरी भी चूप, मेरी भी चूप असे धोरण अवलंबले जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. महापालिका निवडणूक यंत्रणा झोपली आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

प्रचार सभा, बैठका व मेळाव्यांसाठी ३०२ अर्ज प्राप्त झाले होते, त्यापैकी बहुतांश कार्यक्रमांना परवानगी देण्यात आल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली आहे. शहरात ३४२ प्रचार कार्यालयांना परवानगी, तर ३०७ मिरवणूक व रॅलींना मंजुरी देण्यात आली. विशेष म्हणजे संपूर्ण प्रचार कालावधीत एकच रोड शो झाला. आतापर्यंत एकूण २४२६ प्रचार कार्यक्रमांना परवानगी देण्यात आल्याची अधिकृत नोंद आहे.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये टेकलॉन्स-२०२६ आंतरराष्ट्रीय तांत्रिक महोत्सवाचे भव्य आयोजन

## विद्यार्थ्यांना ११ लाख रुपयांचे पारितोषिक जिंकण्याची सुवर्ण संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती-**

टेकलॉन्स २०२६ या आंतरराष्ट्रीय स्तरावरील भव्य तांत्रिक महोत्सवाचे आयोजन यंदा १७ जानेवारी ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत अमरावती येथील पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम मध्ये करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित सोहळ्याचा शुभारंभ देशाचे माजी राष्ट्रपती व भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते झाला असून या महोत्सवा मध्ये सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक आणि राजकीय क्षेत्रातील जागतिक ख्यातीच्या व्यक्तिमत्त्वांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दरवर्षी मिळते. विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पना आणि प्रकल्प सादर करण्यासाठी टेकलॉन्स २०२६ हे एक अभूतपूर्व व्यासपीठ आहे. पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मधील विविध क्लबसच्या विद्यार्थ्यांच्या या महोत्सवाच्या आयोजना मध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग राहणार आहे. १९ तारखेला स्मार्ट इंडिया हॅक्थॉन राहणार असून याचे उद्घाटन श्री आनंद देशपांडे संचालक पॅरिस्टंट सिस्टीम यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेमध्ये देशभरातील ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी या स्पर्धेकरिता उपस्थित राहणार आहे. २० जानेवारी २०२६ रोजी आयएएस ऑफिसर श्री स्वप्नील वानखडे साहेब विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहे.

### विद्यार्थ्यांसाठी कौशल्य प्रदर्शन व जिंकण्याची सुवर्णसंधी

या तांत्रिक सोहळ्यांमध्ये अमरावती विभागासह महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांचे बहुसंख्य विद्यार्थी सहभागी होणार असून, स्मार्ट इंडिया हॅक्थॉन, कोडेथॉन, डेटाथॉन, एक्सेलरेट, स्टार्टअप कॉम्पिटिशन प्रोजेक्ट, मॉडेल एक्झिबिशन, क्र्ड वॉर, टॅलेंट बॅटल, लॅन गेमिंग, सर्किट मॅनिया, बिझनेस प्लॅन, पेपर आणि पोस्टर प्रेझेंटेशन, ॲग्रीकल्चर एक्झिबिशन, स्ट्रक्ट फेस्ट, अन्वेन्शन, आयडिया थॉन , नर्सिंग स्किलथॉन , बिझनेस पीच , डिझाईन कॉम्पिटिशन, डिबेट फेसऑफ आणि इतर ऑन-स्पॉट इव्हेंट्स मध्ये आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करणार आहेत. विजेत्यांना ११ लाखांहून अधिक बक्षिसे आणि प्रोत्साहनपर बक्षिसांचा वर्षाव होणार आहे. या कार्यक्रमाला २०,००० हून अधिक प्रेक्षकांची उपस्थिती अपेक्षित आहे, ज्यामुळे ज्या कंपन्यांना या विशाल प्रेक्षकांपर्यंत पोहचायचे आहे, त्यांच्यासाठी ही उत्तम संधी ठरणार आहे.

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम



स्वप्निल वानखडे



आनंद देशपांडे

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने टेकलॉन्स-२०२६ अंतर्गत विविध उपक्रमांची सविस्तर आणि प्रभावी मालिका राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक, मानसिक, सांस्कृतिक तसेच आध्यात्मिक विकास साधण्यावर भर देण्यात आला आहे. या मालिकेची सुरुवात १० ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा सप्ताहाने होणार असून, विविध क्रीडा स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण, स्पर्धात्मक वृत्ती तसेच शारीरिक तंदुरुस्तीचा विकास घडवून आणला जाणार आहे. त्यानंतर १७ जानेवारी २०२६ रोजी सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण करणारा श्री संत गजानन महाराज महापारायण सोहळा आयोजित करण्यात आला असून, या सोहळ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय परंपरा, संस्कृती आणि आध्यात्मिक मूल्यांची ओळख करून देण्यात येणार आहे. पुढे २० जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण विचारांना, तांत्रिक कौशल्यांना आणि संशोधन वृत्तीला व्यासपीठ मिळावे यासाठी तांत्रिक प्रदर्शन व विविध टेक्निकल इव्हेंट्सचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामध्ये विद्यार्थी आपल्या अभिनव प्रकल्पांची, मॉडेल्सची आणि कल्पनांची मांडणी करणार आहेत. यानंतर २१ जानेवारी २०२६ रोजी संतपरंपरेचा वारसा जपणारा आणि भारतीय संस्कृतीशी नाते दृढ करणारा पारंपरिक दिंडी सोहळा आयोजित करण्यात येणार असून, या सोहळ्यात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. अशा बहुआयामी उपक्रमांच्या माध्यमातून टेकलॉन्स-२०२६ हे केवळ तांत्रिक महोत्सव न राहता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी एक सर्वसमावेशक आणि प्रेरणादायी व्यासपीठ ठरणार आहे.

# मकर संक्रांतीच्या पर्वावर पतंग बाजार निवडणूक चिन्हांनी सजला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि १३अमरावती** मकर संक्रांतीचा सण काही दिवसांवर आला आहे आणि अमरावतीचा ऐतिहासिक साबनपुरा परिसर पतंग आणि




### मतदान करण्याचे आवाहन करणारी पतंग ठरते आकर्षण

दोरीच्या खरेदी-विक्रीने गजबजलेला आहे. यासोबतच, पतंग बाजार निवडणूक चिन्हांनी सजला आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या वेळी राजकीय पक्षांच्या चिन्हांनी सजवलेले पतंग आकाशात उडतात तेव्हा असे वाटेल की राजकारणही आकाशात खेळत आहे.

अमरावतीची ही पतंग संस्कृती गेल्या तीन पिढ्यांप्रमाणेच उत्साहाने आणि परंपरेने सुरू आहे. असंख्य आर्थिक संकटे आणि काळातील बदल सहन करूनही, जमील भाईंनी कधीही त्यांच्या पतंगांची गुणवत्ता आणि कौटुंबिक वारसा तुटू दिला नाही. सुरक्षिततेला प्राधान्य देणारे पतंग हे त्यांच्या यशाचे रहस्य आहे, त्यांच्या मते, मुले स्वतः मांजा बनवण्यात आणि पतंग डिझाइन करण्यात तासनतास घालवत असत. गेल्या ६० वर्षांपासून, या संस्कृतीत सातत्याने आदराने घेतले जाणारे एक नाव म्हणजे जमील पतंगवाले, किंवा जमील भाई. १९६५ मध्ये सुरूझालेला हा व्यवसाय आजही तितकाच मजबूत आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने जमिल भाई यांनी मतदान करा असा मजकुर असलेली पतंग तयार केली आहे ती पतंग सध्या आकर्षण ठरत आहे.

तथापि, आजच्या वेगवान पिढीला सर्वकाही सर्वकाही तयार हवे आहे आणि वेळेच्या कमतरतेमुळे ही पिढी तयार पतंग आणि मांजाकडे वळली आहे, या वर्षीच्या बाजारपेठेतील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे १००% शुद्ध कापसाचा मांजा, जो पर्यावरण संरक्षण लक्षात घेऊन विकला जात आहे. शिवाय, पतंग निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल, जो पूर्वी आसाममधून येत होता, तो आता उत्तर प्रदेशातून येत आहे, ज्यामुळे पतंगांची गुणवत्ता आणखी चांगली होते. पतंग बनवणे हा केवळ एक व्यवसाय नाही तर एक नाजूक कला आहे. जमील भाईच्या मते, उच्च-गुणवत्तेच्या पतंगाच्या उत्पादनासाठी सात वेगवेगळ्या कारागिरांचे श्रम लागतात. जमील भाईंनी स्पष्ट केले की, अमरावतीच्या पतंग उडवण्याचे आणखी एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे त्याची फिरकी. भारतातील फक्त अमरावतीमध्ये बनवलेला हा अनोखा पतंग कोणालाही कोणत्याही मदतीशिवाय तासनतास निर्भयपणे पतंग उडवण्याची परवानगी देतो.


यावर्षीचा संक्रांतीचा सण राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचा ठरेल, कारण येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांचे चिन्ह आणि ध्वज असलेल्या पतंगांना बाजारात मोठी मागणी आहे. त्यामुळे जमील भाईनी असा विश्वास व्यक्त केला की यावेळी अमरावतीचे आकाश केवळ पतंगांनीच नव्हे तर राजकीय पक्षांच्या पतंगांनीही भरून जाईल.

# नवसारी ते कठोरा मार्गावरील वाहतुकीत बदल

## मतमोजणीमुळे वाहनांना पर्यायी मार्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ अमरावती,-** अमरावती महानगरपालीका अमरावती सार्वत्रीक निवडणुक - २०२६ मतमोजणी दिनांक १६ जानेवारी रोजी डॉ. पंजाबराव देशमुख क्रिडा व वाणिज्य संकुल, (महानगरपालीका) नवसारी, अमरावती येथे सकाळी १० वाजतापासून होत आहे. तत्पूर्वी दिनांक १५ जानेवारी मतदान प्रक्रीया आटोपल्यानंतर मतदान केंद्रावरील एव्हीएम मशीन, कंट्रोल युनीट, व्हीव्हीपॅट, इत्यादी साहित्य घेवुन वाहनांची वर्दळ मतमोजणी केंद्र परिसरात मोठ्या प्रमाणात राहणार आहे. यामुळे या मार्गावरीलवाहतुकीत बदल करण्यात येत आहे. यासंदर्भात वाहतुक विभागाने निर्देश जारी केले आहेत. निर्देशा नुसार, दिनांक १६ जानेवारी रोजी मतमोजणी प्रक्रीया करीता सकाळी ८ वाजतापासून पासुन संबंधीत अधिकारी, उमेदवार,




मतमोजणी प्रतिनिधी तसेच सर्वसामान्य नागरिक हे मतमोजणी केंद्र महानगरपालीका क्रिडा संकुल, नवसारी परिसरात दाखल होतील. यादरम्यान मतमोजणी केंद्रासमोरील मार्गावर वाहतुक कोंडी, अपघात यासारख्या घटना व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये या करीता पोलीस उपायक्त शहर यांनी वरिष्ठांच्या आदेशाने खालील प्रमाणे वाहतुक मार्गात बदल व पर्यायी मार्गाने वाहतुक वळविण्यासाठी अधिसुचना जारी केली आहे.कठोरा ते छत्रपती संभाजी राजे चौक (राजपुत धाबा) चौक पर्यंत प्रवेश बंदी राहणार आहे. गुरुवार १५ जानेवारीचे रात्री १० वा पासुन शुक्रवार १६ जानेवारी रोजी संपुर्ण मतमोजणी प्रक्रीया संपे पर्यत ही प्रवेशबंदी राहणार आहे.

**कालावधी :-**गुरुवार १५ जाने चे रात्री १० वा. पासुन शुक्रवार १६ जानेवाराली मतमोजणी संपेपर्यंत

**हे राहणार पर्यायी मार्ग-**

अ) पंचवटी कडुन नवसारी कडे जाणाऱ्या सर्व वाहनांनी कठोरा नाका-रंगोली लॉन-कठोरा जकात नाका या पर्यायी मार्गाचा वापर करावा.

ब) राजपुत धावा कडुन पंचवटी कडे येणाऱ्या सर्व वाहनांनी पर्यायी मार्ग राजपुत धाबा रिंगरोड - पोटे पाटील चौक कठोरा नाका (फक्त एस टी बस व प्रवासी वाहनांकरीता) किवा राजपुत धाबा रिंगरोड पोटे पाटील चौक रहाटगांव टी पॉइंट या मार्गाचा अवलंब करावा. आदेशात नमुद कालावधीत घातलेल्या निर्बंधाचे सर्व वाहन चालकांनी काटेकोरपणेपालन करुन पोलीस विभागास आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस वाहतूक विभागाने केले आहे.

# निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदानाला सुरुवात

## २,२०० कर्मचाऱ्यांना 'स्पीड पोस्ट' द्वारे टपाली मतपत्रिका

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.१३अमरावती**

अमरावती महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी टपाली मतपत्रिकेद्वारे (पोस्टल बॅलेट) मतदानाची प्रक्रिया सुरू झाली असून, सुमारे २ हजार २०० निवडणूक कर्मचाऱ्यांनी टपाली मतदानासाठी लेखी अर्ज दाखल केले असल्याची माहिती महापालिकेच्या निवडणूक विभागाने दिली आहे.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध विभागांतील शासकीय कर्मचारी, पोलीस व गृहरक्षक दलाचे जवान (होमगार्ड) यांची शहर व जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी निवडणूक कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे १५ जानेवारी रोजी प्रत्यक्ष मतदान करणे शक्य नसलेल्या कर्मचाऱ्यांनी टपाली मतपत्रिकेद्वारे मतदानासाठी अर्ज केले होते.या अर्जाच्या आधारे सातही निवडणूक झोनमधील निवडणूक निर्णय अधिकारी (आरओ) कार्यालयांकडे संबंधित उमेदवारांची यादी आली. त्यानंतर आरओकार्यालयामार्फत संबंधित कर्मचाऱ्यांना 'स्पीड पोस्ट'द्वारे तातडीने टपाली मतपत्रिका पाठविण्यात आल्या आहेत. काही कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष संपर्क साधून मतपत्रिका वितरितही करण्यात आल्या.दरम्यान, १० ते १२ जानेवारीदरम्यान टपाली मतदान करून मतपत्रिका परत पाठवाव्यात, असे आवाहन आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा यांनी केले होते. तथापि, अद्याप मतपत्रिका परत न केलेल्या कर्मचाऱ्यांना १५ जानेवारी रोजी मतदानाच्या दिवशीसुद्धा त्यांच्या टपाली मतपत्रिका संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करता येणार आहेत.

### १४ जानेवारीपर्यंत आरओंकडे मतपत्रिका जमा करण्याचे आवाहन

टपाली मतपत्रिकेद्वारे मतदान करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी शक्यतो १४ जानेवारीपर्यंत त्यांच्या प्रभागाशी संबंधित झोनमधील निवडणूक निर्णय अधिकारी (आरओ) कार्यालयात मतपत्रिका जमा कराव्यात, असे आवाहन निवडणूक विभागाकडून करण्यात आले आहे.



# हजारो ज्येष्ठ नागरिक मतदानाला मुकणार; प्रशासनाची अनास्था समोर

## घरून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

महानगरपालिका निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान व्हावे, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाकडून करण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्षात या निवडणुकीबाबत निवडणूक आयोग व प्रशासनाची अनास्था कायम असल्याचे चित्र परत एकदा समोर आले आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीबाबत नियमांत तरतूद असल्याने दोन्ही निवडणुकीत ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना घरून मतदान करता आले होते. मात्र, महानगरपालिका निवडणुकीत तशी सुविधा राहणार नाही. त्यामुळे शहरातील हजारो ज्येष्ठ नागरिक मतदानाला मुकण्याची



भीती व्यक्त करण्यात येत आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी प्रशासनाने विविध पावले उचलली होती. त्यात ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मतदान करणे अधिक सोयीचे व्हावे, यासाठी थेट घरीच निवडणूक कर्मचारी जात होते. आयोगाने याचा मोठ्या प्रमाणावर प्रचार-प्रसारदेखील केला होता. मात्र, नागपूर महानगरपालिका निवडणुकीत याबाबत कुठलेही पाऊल अद्यापपर्यंत उचलण्यात आलेले नाही. सजग मतदार असलेल्या ज्येष्ठ नागरिकांकडून याबाबत वारंवार विचारणा होत आहे. मात्र, याबाबत अधिकाऱ्यांकडेदेखील कुठलेही उत्तर नाही.

प्रत्येक बूथवर जवळपास १० तरी मतदार ८५ वर्षांचे असून अनेकांना घराबाहेर निघणेदेखील शक्य नाही. अशा स्थितीत हजारो मतदार मतदानाला मुकण्याची शक्यता आहे. याबाबत मनपा निवडणूक विभाग यांच्या सोबत संपर्क केला असता राज्य निवडणूक आयोगाकडून याबाबत कुठलेही अधिकृत निर्देश आलेले नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

**अटीतटीच्या प्रभागांत प्रत्येक मत महत्त्वाचे**

काही प्रभागांमध्ये उमेदवारांमध्ये अतिशय अटीतटीची लढत होण्याची शक्यता आहे. अशा ठिकाणी १० ते २० मतेदेखील महत्त्वाची ठरू शकतील. त्यामुळे त्या प्रभागात घराबाहेर निघू न शकणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना मतदान करताच आले नाही तर मोठा उलटफेर होऊ शकतो.

**ही शंभर टक्के प्रशासनाची चूकच**

याबाबत भाजपकडून निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र पाठविण्यात आले होते. मात्र, त्याची कुठलीही दखल प्रशासनाने घेतलेली नाही. मतदान हा सर्वांचा अधिकार आहे. मतदान वाढावे, निवडणूक अधिकाऱ्यांची ही जबाबदारी आहे. मात्र, ज्येष्ठांकडे दुर्लक्ष होत असेल व त्यांच्यासाठी काहीही नियोजन होणार नसेल तर ती प्रशासनाची शंभर टक्के चूक आहे, असा आरोप जेष्ठ नागरिक करीत आहे.

# अमरावती महापालिका निवडणूक प्रचाराचे भोंगे थांबले; उद्या कत्ल की रात

## १५ जानेवारीला मतदान, १६ ला निकाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अमरावती महापालिका निवडणुकीचा जाहीर प्रचार आज मंगळवार, १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपुष्टात येणार आहे. त्यानंतर गुरुवार, १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मतमोजणी शुक्रवार, १६ जानेवारी रोजी होणार असून, त्यानंतर नवीन नगरसेवकांची नावे स्पष्ट होतील.

अमरावती शहरातील २२ प्रभागांतून एकूण ८७ नगरसेवक निवडून दिले जाणार असून, यासाठी तब्बल ६६१ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

प्रचाराच्या अंतिम टप्प्यात भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि एमआयएम यांच्या सभांचा



जोर पाहायला मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी भाजप उमेदवारांसाठी सभा घेतल्या. मुख्यमंत्र्यांनी शहरात रोड शोही केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या उमेदवारांचा प्रचार केला, तर अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांसाठी जनतेकडे मतांची मागणी केली. सर्वच नेत्यांनी विकासाचे व्हिजन मांडत अमरावतीला अधिक विकसित शहर बनवण्याची ग्वाही दिली.दरम्यान, एमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांनीही जाहीर सभा घेत इतर पक्षांवर टीका केली. एमआयएम हा सर्वसामान्य जनतेसाठी लढणारा पक्ष असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला.या तुलनेत काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षांचा प्रचार काहीसा फिका राहिला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अमरावतीचा दौरा करून काही प्रभागांत उमेदवारांसाठी मतांची मागणी केली, मात्र त्यांची कोणतीही जाहीर सभा झाली नाही.शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्याही कोणत्याही बड्या नेत्याची अमरावतीत जाहीर सभा झाली नाही. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, खासदार अरविंद सावंत आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्या सभांची चर्चा होती, मात्र त्या प्रत्यक्षात झाल्या नाहीत.आता प्रचाराचे भोंगे शांत झाल्यानंतर शहराचे लक्ष थेट १५ जानेवारीच्या मतदानाकडे लागले असून, १६ जानेवारी रोजी अमरावती महापालिकेच्या सत्तेचा फैसला होणार आहे.

# शिक्षक मतदारसंघात ३३ हजार मतदार

## अंतिम यादी जाहीर, तरीही मतदार नोंदणी सुरूच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

विधान परिषदेच्या शिक्षक मतदारसंघाची अंतिम मतदार यादी सोमवार, १२ जानेवारी रोजी घोषित करण्यात आली आहे. या यादीनुसार मतदारसंघात एकूण ३३ हजार नऊ मतदार आहेत. मात्र, अद्यापही नवी मतदार नोंदणी प्रक्रिया सुरू असून, संबंधित मतदारांची नावे पुरवणी यादीत समाविष्ट केली जातील, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी दिली.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार डॉ. सिंघल यांनी सोमवारी सायंकाळी माध्यमांशी संवाद साधला. १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकानुसार ही मतदार यादी तयार करण्यात आली आहे. मागील वेळी झालेल्या बोगस मतदार नोंदणीची दखल घेऊन यावेळी सुरुवातीपासूनच बारकाईने लक्ष देण्यात आले.

यासाठी विभागातील पाचही सहायक निवडणूक अधिकाऱ्यांना (जिल्हाधिकाऱ्यांना) विशेष सूचना देण्यात आल्या होत्या. प्राप्त अर्जांची बारकाईने पडताळणी करूनच पात्र शिक्षकांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. या निवडणुकीसाठी दरवेळी नव्याने मतदार यादी तयार केली जाते.

गेल्या वर्षी ३० सप्टेंबरपासून मतदार नोंदणी सुरू करण्यात आली होती. या नोंदणीसोबतच दावे आणि हरकतीही स्वीकारण्यात आल्या. ६ नोव्हेंबर हा हरकती स्वीकारण्याचा शेवटचा दिवस होता. या कालखंडात प्राप्त झालेले दावे व हरकती



विचारात घेऊन प्रत्येक तक्रारीची पडताळणी करण्यात आली.

त्यानंतरच संबंधित नावांना अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले, असे आयुक्त डॉ. सिंघल यांनी स्पष्ट केले. यावेळी अप्पर आयुक्त संजय जाधव, तहसीलदार अनिता झाडे, नायब तहसीलदार श्याम देशमुख, विभागीय माहिती कार्यालयाचे सहायक संचालक विजय राऊत आदी अधिकारी उपस्थित होते.

अंतिम मतदार यादी तयार करण्याच्या प्रक्रियेत ३ ते १८ डिसेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात आल्या. तत्पूर्वी, ३० हजार ८६५ नावांचा समावेश असलेली प्रारूप मतदार यादी घोषित करण्यात आली होती. या यादीवर सुमारे ३ हजार ९१७ हरकती व दावे प्राप्त झाले.

या हरकतींच्या आधारे १ हजार ४९ मतदारांची नावे रद्द करण्यात आली. त्यामुळे डिसेंबरअखेर या यादीत २९ हजार ८१६ नावे उरली होती. मात्र, याच काळात ४ हजार ४६ शिक्षकांकडून नवीन अर्ज प्राप्त झाले. या अर्जांची पडताळणी करून त्यातील पात्र नावे प्रारूप यादीत समाविष्ट करण्यात आली, ज्यामुळे अंतिम मतदार यादीतील एकूण नावे ३३ हजार नऊवर पोहोचली.

# दोन्ही ढोलक्या वाजवणाऱ्यांना मतदारांनी धडा शिकवावा - खा.डॉ.अनिल बोंडे

## नवनीत राणा यांचे नाव न घेता केला शाब्दिक प्रहार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

दोन्ही ढोलक्या वाजवणाऱ्यांना मतदारांनो योग्य जागा दाखवा, सावध व्हा. ते रोड शोदरम्यान मुख्यमंत्र्यांच्या गाडीत बसतात, हात वर करतात व नंतर उतरून जातात, अशा शब्दांत भाजपाचे राज्यसभा खा. डॉ. अनिल बोंडे यांनी प्रभाग क्र. १९ साईनगरच्या साईरत्न लॉनमध्ये दु. २ वाजता आयोजित भाजपा उमेदवारांच्या प्रचार सभेत भाजपाच्या स्टार प्रचारक माजी खा. नवनीत राणा यांचे नाव न घेता त्यांच्यावर टिकास्त्र सोडले.

सोमवार १२ रोजी साईनगर प्रभागात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची सभा झाली. पालकमंत्र्यांच्या सभेतच आधी डॉ. बोंडे यांनी नाव न घेता नवनीत राणा



यांच्या दुटप्पी भुमिकेचा खरपूस समाचार घेतला. एकिकडे त्या भाजपाच्या स्टार प्रचारक म्हणून मिरवतात तर दुसरीकडे घरचा पक्ष असलेल्या युवा स्वाभिमानच्या उमेदवारांसाठी मतं मागतात. या त्यांच्या भुमिकेवरून शहरात राजकीय गदारोळ सुरू आहे. विशेषतः भाजपातील उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते चांगलेच नाराज आहेत. याबाबत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रचार सभेत थेट कोणताही वक्तव्य करण्याचे टाळले. त्यामुळे प्रचार सभेला उपस्थित मतदार आश्चर्य व्यक्त करीत राहिले. पालकमंत्र्यांनी भाजपाचा महापौर बनल्यानंतर मतदारांचा कसा फायदा होणार यावरच सर्वाधिक प्रकाश टाकला. बहुतेक सर्वच सभांमध्ये ते याबाबत बोलत असल्यामुळे त्यांचे सर्व चेंडू हे मतदारांच्या दृष्टीने वाईड ठरले. ही निवडणूक साईनगरप्रभागातील उमेदवार तुषार भारतीय, चेतन गावंडे, लता देशमुख व सरिता मालानी यांच्यासाठी महत्त्वाची आहे. युवा स्वाभिमानने मित्र पक्ष असतानाही येथे त्यांनी ब वार्ड वगळता अ, क व ड वार्डातउमेदवार दिले आहेत. त्यातही ड वार्डात भाजपाचे माजी सभागृह नेते तुषार भारतीय यांच्या विरोधात युवा स्वाभिमानने उमेदवारी दिली आहे. हा प्रभाग सध्या शहरात 'हॉटस्पॉट' आहे.

**मतदारांत्याच नशीबाची निवडणूक ठरणार**

उमेदवारांच्या नशिबाची नव्हे तर खुद्द मतदारांच्याच नशीबाची निवडणूक ठरणार आहे. पालकमंत्र्यांच्या अखत्यारितील विविध योजनांचा सहज लाभ मिळणार असल्याची ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली. अमरावतीला पश्चिम विदर्भातील सर्वात सुंदर शहर बनवायचे असून येथे रिंग रोड, आणखी ८ उड्डाणपुलं उभारली जाणार आहेत. माझ्या ७८५ कोटी निधीतून मी जास्तीत जास्त साईनगरला देईन, असे आश्वासनही पालकमंत्र्यांनी दिले.


# शिक्षणाधिकाऱ्यांच्या बैठकांवर सीईओंची बंधने

## आठवड्यात फक्त मंगळवार, शनिवाररोजीच होणार बैठक : विद्यार्थ्यांचे नुकसान टाळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीता महापात्र यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांवर नियंत्रण आणले आहे. यापुढे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांसह निम्नस्तरीय अधिकाऱ्यांना आठवड्यातून केवळ मंगळवार आणि शनिवार या दोनच दिवशी बैठका घेता येणार आहेत. हा निर्णय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी घेण्यात आला आहे.

शालेय कामकाजाच्या दिवशी बैठका आयोजित केल्यास शिक्षकांना अध्यापन करता येत



नाही, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. सीईओ महापात्र यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषदेच्या शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवले जात आहेत. प्रत्येक विद्यार्थी ज्ञानाच्या दृष्टीने प्रगत आणि प्रगल्भ व्हावा, हा या उपक्रमांमागील मुख्य उद्देश आहे. मात्र, पुरेसे अध्यापनच होत नसेल, तर हा उद्देश साध्य होणार नाही, हे लक्षात घेऊन ही नवी आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

या नव्या आचारसंहितेनुसार, शिक्षकांना यापुढे कोणत्याही दिवशी वरिष्ठाधिकाऱ्यांकडून बैठकीसाठी बोलावले जाणार नाही. तसेच, मुख्याध्यापक किंवा कोणत्याही शिक्षकाला शाळा सोडून इतर कामासाठी केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकाऱ्यांकडे जायचे असल्यास, त्यासाठी संबंधित पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल. यामुळे शाळांमध्ये शिक्षकांची उपस्थिती वाढेल आणि अध्यापनाचे कार्य सुरळीत होईल अशी अपेक्षा आहे.सीईओ संजीता महापात्र यांनी सुरू केलेल्या 'गप्पा विथ सीईओ' या कार्यक्रमादरम्यान अनेक शाळांना भेटी दिल्या. त्यावेळी त्यांना अनेक ठिकाणी शिक्षक अनुपस्थित आढळले. शिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती स्तरावरील गटशिक्षणाधिकारी यांच्या बैठका किंवा टपाल पोहोचवण्यासाठी गेल्याचे कारण शिक्षकांनी दिले. या बेशिस्तपणाला आळा घालण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे हित जपण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# राजस्थानमधील खुनाचा फरार आरोपी मोर्शीत पकडला

## श्रीनाथजी मंदिर परिसरातील गुन्ह्यात राजस्थान पोलिसांकडून अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मोर्शी**

मोर्शी येथे राजस्थानमधील खुनाच्या गुन्ह्यातील एका फरार आरोपीला अटक करण्यात आली आहे. मोहम्मद इसहाक मोहम्मद शफी लोहार (वय ३८) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. राजस्थानच्या श्रीनाथजी मंदिर, नागद्वारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तो फरार झाला होता.

आरोपी मोहम्मद इसहाक याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) अन्वये राजस्थानमध्ये गुन्हा दाखल आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो फरार झाला होता आणि राजस्थान पोलीस त्याचा शोध घेत होते.

दरम्यान, हा आरोपी मोर्शी येथे लपून बसल्याची माहिती राजस्थान पोलिसांना मिळाली. त्यांनी तात्काळ मोर्शी पोलिसांशी संपर्क साधला. दोन्ही राज्यांच्या पोलिसांनी संयुक्तपणे सापळा रचून मोहम्मद इसहाकला मोर्शी शहरातून ताब्यात घेतले.

मोर्शी पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर राजस्थान पोलिसांच्या स्वाधीन केले. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण, स्वप्निल बायस्कर आणि अथर्व कोहळे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# क्रीडा संकुल नवसारी येथील मतमोजणी केंद्र सुसज्ज - आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर होणारी मतमोजणी प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक, निष्पक्ष व सुरळीत पार पाडण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने अत्यंत काटेकोर व बहुस्तरीय तयारी केली आहे. या तयारीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज अमरावती महानगरपालिका क्रीडा संकुल (स्पोर्ट कॉम्प्लेक्स) नवसारी येथील मतमोजणी केंद्राची सखोल पाहणी केली.

या पाहणीदरम्यान आयुक्तांनी मतमोजणी कक्ष, स्ट्राँग रूम, मीडिया सेंटर, सुरक्षा व्यवस्था, प्रवेश-निर्गमन मार्ग, वाहतूक व पार्किंग नियोजन, तसेच आपत्कालीन सेवा यांचा सविस्तर आढावा घेतला. मतमोजणी केंद्रात येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, उमेदवारांचे प्रतिनिधी, माध्यम प्रतिनिधी व इतर अधिकृत व्यक्तींसाठी स्वतंत्र प्रवेश व निर्गमन





गेट ठेवण्यात आले असून गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी नियोजनबद्ध मांडणी करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या सातही झोनसाठी स्वतंत्र मतमोजणी कक्ष तयार करण्यात आले असून प्रत्येक झोनचा निकाल स्वतंत्रपणे आणि अचूकरीत्या मांडता यावा यासाठी अत्याधुनिक व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणीदरम्यान निकाल थेट एलईडी स्क्रीनवर प्रदर्शित होणार असून त्यामुळे नागरिक व माध्यम प्रतिनिधींना त्वरित व पारदर्शक माहिती उपलब्ध होणार आहे.

मतपेट्या व ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्राँग रूममध्ये बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. सीसीटीव्ही देखरेख, पोलीस बंदोबस्त व प्रवेश नियंत्रण प्रणालीमुळे कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये याची दक्षता घेतली जात आहे. तसेच उमेदवारांचे प्रतिनिधी व एजंट यांच्यासाठी स्वतंत्र, सुव्यवस्थित बसण्याची व निरीक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

माध्यम प्रतिनिधींकरिता सुसज्ज मीडिया सेंटर उभारण्यात आले असून त्याठिकाणी इंटरनेट, वीजपुरवठा, माहिती फलक व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १५ व १६ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतमोजणीदरम्यान पत्रकारांना निकालांची माहिती वेळेवर मिळावी, यासाठी स्वतंत्र समन्वय यंत्रणा कार्यरत राहणार आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस यंत्रणा, होमगार्ड व सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय वीजपुरवठा, स्वच्छता, अग्निशमन सेवा, रुग्णवाहिका व वैद्यकीय सुविधा या सर्व बाबींचेही विशेष नियोजन करण्यात आले आहे.

**यावेळी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की**

मतमोजणी ही लोकशाही प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची बाब आहे. नागरिकांचा जनादेश अचूक व पारदर्शक पद्धतीने प्रतिबिंबित व्हावा, यासाठी प्रशासनाने प्रत्येक स्तरावर दक्षता घेतली आहे. कोणत्याही प्रकारची त्रुटी, गोंधळ किंवा गैरप्रकार होणार नाही, याची आम्ही पूर्ण काळजी घेत आहोत.

या पाहणीवेळी उपआयुक्त योगेश पिठे, उपायुक्त दादाराव डोल्हारकर, शहर अभियंता रविंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, कार्यकारी अभियंता सुहास चव्हाण, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, उपअभियंता शरद तिनखेडे, अभियंता राजेश आगरकर, सुधीर गोटे, निवडणूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# मतदानासाठी कामगारांना भरपगारी सुट्टी सर्व आस्थापनांना सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ च्या परिच्छेद १३५ (बी) नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. त्यानुसार दि. १५ जानेवारी रोजी महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करण्यासाठी आस्थापना व उद्योगांनी आपल्या कर्मचा-यांना भरपगारी सुट्टी द्यावी, असे निर्देश सहायक कामगार आयुक्त्यांनी दिले आहेत.

काही संस्था/आस्थापना इ. त्यांच्या कामगारांना भरपगारी सुट्टी किया सवलत देत नाहीत. त्यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित रहावे लागते. हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. असे निदर्शनास आल्यास आस्थापनांवर कारवाई करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

हा आदेश खाजगी कंपन्या, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी, हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिग सेंटर, मॉल्सर, रिटेलर्स आदी सर्वांना लागू राहील. अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात संबंधित अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.




# लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा:संक्रांतीआधी महिलांना १५०० रुपयांचा आर्थिक दिलासा; आचारसंहितेतून वाट मोकळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

राज्यातील लाडक्या बहिणींना संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर मोठा दिलासा मिळाला असून, यंदाच्या महिन्यातील १५०० रुपयांचा हफ्ता आजपासून त्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा होऊ लागला आहे. सकाळपासूनच अनेक महिलांच्या मोबाईलवर बँक मेसेज येऊ लागल्याने या योजनेचा लाभ प्रत्यक्षात सुरू झाल्याचे चित्र आहे. राज्यात सध्या महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना आणि आदर्श आचारसंहिता लागू असताना, निवडणूक आयोगाने नियमित लाभ देण्यास परवानगी दिल्यामुळे हा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, एकरकमी तीन हजार रुपये देण्याच्या चर्चांना आयोगाने स्पष्टपणे मज्जाव केल्याने या निर्णयाला राजकीय तसेच प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू आहे. या काळात कोणत्याही नव्या योजना, नवीन लाभार्थी किंवा मतदारांना आकर्षित करणाऱ्या घोषणा करण्यास मनाई असते. याच कारणामुळे 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत जानेवारी महिन्याचा लाभ अग्रिम स्वरूपात देण्यास राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट नकार दिला. मात्र, आधीपासून सुरू असलेल्या आणि नियमित स्वरूपातील लाभ देण्यास आयोगाने परवानगी दिली. त्यामुळे डिसेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हफ्ता आजपासून लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांमध्ये जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

दरम्यान, मकर संक्रांतीच्या निमित्ताने १४ जानेवारीपूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचे मिळून ३००० रुपये जमा होणार, अशा आशयाच्या बातम्या आणि सोशल मीडियावरील पोस्टमुळे मोठा गोंधळ निर्माण झाला होता. या दाव्यांच्या आधारे राज्य निवडणूक आयोगाकडे विविध तक्रारी दाखल झाल्या. काही राजकीय पक्ष आणि नागरिकांनी हा प्रकार आचारसंहितेचा भंग ठरतो का, असा सवाल उपस्थित केला. याची दखल घेत राज्य निवडणूक आयोगाने थेट मुख्य सचिवांकडे याबाबत वस्तुस्थिती स्पष्ट करण्याचे निर्देश दिले होते.




मुख्य सचिवांनी सादर केलेल्या अहवालात महत्त्वाची बाब स्पष्ट करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशानुसार, निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रत्यक्ष सुरू झालेल्या विकासकामे व योजना आचारसंहिता काळात सुरू ठेवण्यास परवानगी आहे. मात्र, त्या योजनांचा लाभ अग्रिम स्वरूपात देणे, नवीन लाभार्थी निवडणे किंवा लाभाच्या रकमेबाबत बदल करणे हे आचारसंहितेच्या विरोधात ठरते. हीच भूमिका निवडणूक आयोगाने 'लाडकी बहीण' योजनेबाबत घेतली.

**योजनेचा नियमित लाभ मात्र अग्रिम लाभ देता येणार नाही**

या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट निर्देश दिले की, योजनेचा नियमित लाभ देता येईल; मात्र अग्रिम लाभ देता येणार नाही आणि कोणत्याही नव्या लाभार्थीची निवडही करता येणार नाही. त्यामुळे, तीन हजार रुपयांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले असले तरी किमान १५०० रुपयांचा नियमित हफ्ता तरी वेळेत मिळणार असल्याने कोट्यवधी लाडक्या बहिणींना दिलासा मिळाला आहे. आयोगाच्या या निर्णयानंतर प्रशासनाने तत्काळ हालचाली करत आजपासून रक्कम थेट बँक खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया सुरू केली.

**१५ जानेवारी रोजी मतदान**

राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीतील काही घटकपक्षांच्या उमेदवारांकडून सोशल मीडियावर १४ जानेवारीपूर्वी तीन हजार रुपये खात्यात जमा होणार असल्याचे दावे करण्यात येत होते. यामुळे विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतला होता. मकर संक्रांतीच्या दिवशी निधी वितरित करणे म्हणजे निवडणूक आचारसंहितेचा भंग नाही का? असा थेट सवाल विरोधकांकडून उपस्थित करण्यात आला होता. त्यामुळेच निवडणूक आयोगाने या संपूर्ण प्रकरणाकडे गांभीर्याने पाहत स्पष्ट भूमिका घेतली.

**१५०० रुपयांचा हफ्ता वेळेत मिळाल्याने समाधान**

अखेर आचारसंहितेच्या कात्रित अडकलेल्या 'लाडकी बहीण' योजनेला मर्यादित का होईना, पण मोकळा श्वास मिळाला आहे. तीन हजार रुपयांची अपेक्षा पूर्ण न झाली असली तरी, नियमित १५०० रुपयांचा हफ्ता वेळेत मिळाल्याने अनेक महिलांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. मतदानाच्या अवघ्या दोन दिवस आधी सुरू झालेल्या या निधीवितरणामुळे राजकीय आरोप-प्रत्यारोपांना पुन्हा एकदा धार आली असली, तरी निवडणूक आयोगाच्या स्पष्ट आदेशांमुळे हा वाद तात्पुरता तरी शांत झाल्याचे दिसून येत आहे.

# अमरावतीत कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता फक्त कमळाला मतदान करा : मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ : अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीत कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता फक्त कमळाला मतदान करा असे आवाहन भाजपाचे नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी केले आहे. अमरावती महानगरपालिकेच्या निवडणूकीत काही राजकिय पक्षांकडून मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या भाषणाचे अंश प्रसारीत करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. चौकाचौकात ध्वनिक्षेपकावरून मुख्यमंत्र्यांच्या भाषणातील त्यांच्या पक्षाविषयी असलेले गौरोवद्गागार प्रसारीत करूनमतदारांची दिशाभूल करण्याचे प्रयत्न सुरू आहे. या मुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. परिणामी मुख्यमंत्री देवेन्द्र



फडणवीस यांनी याबाबत तात्काळ दखल घेत मतदारांना आव्हान केले आहे की कोणत्याही अन्य राजकीय पक्षाच्या अप प्रचाराला बळी पडू नका. अमरावती महानगरपालिकेच्या निवडणूकीत भारतीय जनता पक्षासोबत अन्य कोणत्याही राजकिय पक्षाची युती झालेली नाही. त्यामुळे फक्त आणि फक्त कमळावर मतदान करा. भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना विजयी करा असे आवाहन देवेन्द्र फडणवीस यांनी केले आहे.


# बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अलर्ट:हॉल तिकिट वाटपाला सुरुवात

## हॉल तिकिटावर मुख्याध्यापकांची सही नाही? तर परीक्षेला मुकण्याचा धोका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून इयत्ता बारावीच्या लेखी परीक्षांबाबत महत्त्वाची अधिकृत सूचना जारी करण्यात आली आहे. मंडळाच्या निर्णयानुसार, यंदाच्या शैक्षणिक वर्षातील बारावीच्या लेखी परीक्षेला १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवात होणार असून या परीक्षा १८ मार्च २०२६ पर्यंत चालणार आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मंडळाने बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी हॉल तिकिटांचे वाटप सुरू केले आहे. गेल्या काही दिवसांपासून हॉल तिकिटांची प्रतीक्षा करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

यंदा बारावीच्या परीक्षेसाठी हॉल तिकिटे ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. मात्र, केवळ ऑनलाईन डाउनलोड केलेले हॉल तिकिट ग्राह्य धरले जाणार नसून, संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना त्याची प्रिंट काढून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. मंडळाने सर्व




महाविद्यालयांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, विद्यार्थ्यांकडून हॉल तिकिटाच्या प्रिंटसाठी कोणतेही शुल्क आकारू नये. हॉल तिकिट वाटप पूर्णपणे मोफत असणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही आर्थिक अडचणीशिवाय आपले हॉल तिकिट वेळेत मिळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हॉल तिकिटाबाबत मंडळाने आणखी एक महत्त्वाची अट घातली आहे. विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटावर मुख्याध्यापकांची सही आणि अधिकृत शिक्का असणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्याचा फोटो असलेल्या हॉल तिकिटावर खाली मुख्याध्यापकांची सही आणि शिक्का नसल्यास ते हॉल तिकिट अवैध मानले जाईल. अशा परिस्थितीत संबंधित विद्यार्थ्याला परीक्षा केंद्रात प्रवेश नाकारला जाऊ शकतो, असा इशाराही मंडळाने दिला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी हॉल तिकिट मिळाल्यानंतर त्यावरील सर्व तपशील नीट तपासून, मुख्याध्यापकांची सही आणि शिक्का घेतल्याची खात्री करूनच परीक्षा केंद्रावर जाणे आवश्यक आहे.

बारावीची परीक्षा देण्यासाठी हॉल तिकिट हा अत्यावश्यक दस्तऐवज आहे. कोणत्याही परिस्थितीत हॉल तिकिटाशिवाय विद्यार्थ्याला परीक्षेला बसता येणार नाही, असे मंडळाने स्पष्ट केले आहे. यंदाच्या वर्षी राज्यातील छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर, मुंबई, नाशिक, लातूर, अमरावती आणि कोकण अशा नऊ विभागांमार्फत बारावीच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. या सर्व विभागांतील महाविद्यालयांनी वेळेत हॉल तिकिट वितरणाची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना मंडळाकडून देण्यात आल्या आहेत.

बारावीच्या परीक्षांसोबतच दहावीच्या विद्यार्थ्यांसाठीही महत्त्वाची माहिती समोर आली आहे. दहावीच्या परीक्षेची हॉल तिकिटेही लवकरच विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहेत, अशी माहिती मंडळाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे दहावीचे विद्यार्थी आणि पालकांनीही हॉल तिकिटाबाबत सजग राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी मंडळाकडून सर्व स्तरांवर तयारी केली जात आहे.

# युवा स्वाभिमानच्या कार्यकर्त्यांनी रोखली भाजपाची रॅली

## नेहरू मैदानात काही काळ तणावाचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

युवा स्वाभिमान पार्टीच्या काही कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षाची प्रचार रॅली रोखल्या ने अमरावतीच्या नेहरू मैदान व राजकमल चौकात काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र भाजपाचे आमदार डॉ संजय कुटे यांनी वेळीच हस्तक्षेप करून दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्या मध्ये होणारा संघर्ष मिटविल्याने तणाव लगेचच निवळला. अमरावतीच्या स्थानिक नेहरू मैदानावरून या दोन्ही पक्षांच्या प्रचार रॅली ला पोलीस प्रशासनाने परवानगी दिली होती. त्यांना दिलेल्या वेळेनुसार प्रचार रॅली काढणे अपेक्षित होते. मात्र वेळेपर्यंत युवास्वाभिमान पक्षाचे कार्यकर्ते जमले नाही. तर दुसर्या बाजूने भाजपाचे दोन



हजाराहून अधिक कार्यकर्ते मोटार सायकल घेऊन रॅली साठी तयार होते. पण युवास्वाभिमान पक्षाच्या दहा ते बारा कार्यकर्त्यांनी आमची रॅली प्रथम निघेल हा बालहट्ट केल्याने तणाव वाढला होता. यावेळी युवास्वाभिमान पक्षाचे काही कार्यकर्ते वाहनाच्या समोर झोपले आणि त्यांनी भाजपाची रॅली जाऊ देण्यास मज्जाव केला. पोलिसांनी कार्यकर्त्यांना हटविण्याचा प्रयत्न केला पण कार्यकर्ते बाजूला सरकायला तयार नव्हते. आमदार संजय कुटे यांनी यावेळी पोलीस प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. काही वेळातच युवा स्वाभिमान पक्षाचे कार्यकर्ते बाजूला झाले अन भाजपाची रॅली सुरळीत निघाली.

# दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्माचा भव्य सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३चांदूर रेल्वे**

स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडवत 'आपलं चांदूर पॅनल' ने दणदणीत विजय मिळवला असून, या पॅनलच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रियंका निलेश विश्वकर्मा यांनी भाजप व काँग्रेसच्या उमेदवारांचा पराभव करत ऐतिहासिक यश संपादन केले. विजयानंतर प्रियंका निलेश विश्वकर्मा यांचा दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालेल्या सत्कारामुळे चांदूर रेल्वेच्या विकासकामांसाठी विशेष निधी मंजूर होण्याच्या आशा पल्लवित झाल्या असून, आगामी काळात शहराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

वंचित बहुजन आघाडी, शिवसेना (शिंदे गट), शेतकरी संघटना तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्र येत स्थापन केलेल्या 'आपलं चांदूर पॅनल' ला जनतेने मोठा कौल दिला. या विजयामुळे चांदूर रेल्वेच्या राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे. विजयानंतर नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रियंका निलेश विश्वकर्मा यांचा प्रथम वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर तथा युवा नेते सुजात प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यानंतर शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रियंका विश्वकर्मा यांचा गौरव करण्यात आला. विशेष बाब म्हणजे, राज्यातील दोन्ही उपमुख्यमंत्री आणि वंचित बहुजन आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या हस्ते झालेला हा सत्कार चांदूर रेल्वेच्या राजकीय इतिहासात महत्त्वपूर्ण ठरतो आहे. या प्रसंगातून 'आपलं चांदूर पॅनल' ही सर्वसमावेशक, जनतेच्या विश्वासावर उभी असलेली ताकद असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रियंका विश्वकर्मा यांच्या विजयामुळे महिलांच्या नेतृत्वाला नवे बळ मिळाले असून, येणाऱ्या काळात चांदूर रेल्वेच्या विकासासाठी त्या ठोस भूमिका बजावतील, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.

# खबरदार! नायलॉन मांजाने पतंग उडवाल, तर थेट २५ हजारांचा दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

जीवघेण्या नायलॉन मांजावर आळा घालण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सोमवारी दंडाची रक्कम निश्चित केली. नायलॉन मांजा आढळल्यास प्रत्येकदा २५ हजार रुपये दंड तर विक्री करताना आढळल्यास थेट अडीच लाख रुपयांचा दंड वसूल करण्याचे निर्देश न्यायालयाने महापालिका आणि पोलिसांना दिले. दंडाची रक्कम जिल्हाधिकारी निर्मित एका विशेष खात्यात जमा होणार असल्याचेही न्यायालयाने निर्णयात स्पष्ट केले.

उच्च न्यायालयात २०२१ पासून नायलॉन मांजाबाबत जनहित याचिका प्रलंबित आहे. याचिकेवर सोमवारी न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. दरवर्षी नायलॉनवर आळा घालण्यासाठी वारंवार आदेश देऊनही परिस्थितीत सुधारणा होत नसल्यामुळे न्यायालयाने दंडाचा पर्याय सुचवला होता.



२४ डिसेंबरच्या सुनावणीत न्यायालयाने नायलॉनचा वापर केल्यास ५० हजार दंड आकारण्याची शिफारस केली होती तसेच विदर्भातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले होते. यानंतर दंडाच्या रक्कमेवर कुणाला आक्षेप असल्यास नोंदवण्याची मुभाही दिली होती.

उच्च न्यायालयात काही पालकांनी ५० हजार रुपये जास्त असल्याची तक्रार केल्यावर न्यायालयाने ही रक्कम २५ हजार रुपये केली. अल्पवयीन मुलाकडे नायलॉन आढळल्यास पालकांना ही रक्कम भरावी लागेल तर वयस्काकडे आढळल्यास त्याला स्वत:ला दंड भरावा लागेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

**नियम वर्षभरासाठी कायम राहील**

उच्च न्यायालयाने पालकांच्या विनंतीवरून वापरकर्त्यावरील दंडाची रक्कम कमी केली, मात्र विक्रेत्यांवरील दंडाची रक्कम अडीच लाख रुपयेच ठेवली. दंडाची रक्कम प्रत्येक गुन्ह्यासाठी भरावी लागेल तसेच हा नियम केवळ संक्रांती सणासाठी लागू नसून वर्षभर कायम राहील, असेही न्यायालयाने निर्णयात स्पष्ट केले. पालकांनी त्यांच्या मुलांना नायलॉनच्या धोक्याबाबत समज द्यावी, असे आवाहनही न्यायालयाने केले. याचिकेवर पुढील सुनावणी २० जानेवारी रोजी होणार आहे.

